सागर प्रकाशनचे
सांजवार्ता

औरंगाबाद,
सोमवार, दि. २७ जानेवारी २०१४



राष्ट्रीय बालकामगार शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मिठाई व खाऊ वाटप करताना संस्थेच्या सुरैय्या खान, साजिद पाशा, हुराबानो, सबा नैशिन आदी.

## राष्ट्रीय बालकामगार शाळा

आझाद अली शाह शिक्षण संस्थेच्यावतीने कासीमबरी दर्गा, पडेगाव व लाल माती, भावसिंगपुरा या दोन्ही शाळेच्या वतीने भावसिंगपुरा येथे ध्वजारोहन समारंभ प्रजासत्ताक दिनानिमित्त अतिशय हर्ष, उल्हासात व आनंदमय वातावरणात शिक्षण संस्थेचे प्रशासकिय अधिकारी खान साजिद पाशा यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस राजेंद्र दुबे हे होते. तर प्रमुख पाहूणे ॲड. शेख फेरोज हे होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सायमा खान यांनी केले, तर आभार प्रदर्शन माया आवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळैचे शेख तमन्ना, आशा साळवे, शेखशमशाद, गोदावरी कलसरे, शेख रिजवाना, मिना भालेराव आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता, पालक व शाळेतीं सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करुन करण्यात आली.